

आजचा दिनविशेष
१९२० : शिवराम महादेव परांजपे यांनी स्वराज्य नावाचे साप्ताहिक सुरू केले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com | LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार १२ ऑगस्ट २०२५ | अंक २३४ पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# तर भारत-पाकिस्तानमध्ये युद्ध होणार पाकच्या माजी विदेशमंत्र्याची धमकी

भारत आणि पाकिस्तानमध्ये गेल्या काही महिन्यांपासून तणावाचे वातावरण आहे. अशातच आता पाकिस्तानचे माजी परराष्ट्र मंत्री आणि पाकिस्तान पीपल्स पार्टीचे अध्यक्ष बिलावल भुट्टो झरदारी यांनी भारताला युद्धाची पोकळ धमकी दिली आहे. भारताने जर सिंधू पाणी करार रद्द केला आणि सिंधू नदीवर धरण बांधण्याचा प्रयत्न केला तर दोन्ही देशांमध्ये युद्ध होऊ शकते असं झरदारी यांनी म्हटलं आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.हजरत शाह अब्दुल लतीफ भिट्टाई यांच्या 282 व्या उरूसाचा कार्यक्रम भित शाह येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रात भुट्टो यांनी हे विधान केले आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरुद्ध कठोर भूमिका घेतलेली आहे. भारताने सिंधू पाणी करार थांबवलेला आहे, त्यामुळे पाकिस्तानातील शेती धोक्यात आली आहे. त्यामुळे पाकिस्तानकडून भारताला पोकळ धमकी दिली जात आहे. भारताच्या कारवाईनंतर पाकिस्तान संतापला भारताने दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देताना 7 मे रोजी पाकिस्तान आणि पीओकेमधील 9 दहशतवादी तळांवर हवाई हल्ला करत 100 पेक्षा जास्त दहशतवाद्यांचा खात्मा केला होता. त्यामुळे पाकिस्तानला मोठा धक्का बसला होता. त्यानंतर दोन्ही देशांकडून एकमेकांवर हल्ल्याचा प्रयत्न झाला होता. मात्र 10 मे रोजी दोन्ही देशांनी



युद्धबंदीचा निर्णय घेतला होता. भारतीय अधिकाऱ्यांनाही युद्धाची भीती . काही दिवसांपूर्वी भारतीय लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनीही युद्धाची भीती व्यक्त केली होती. 'ज्या युद्धाची भीती व्यक्त केली जात आहे ते लवकरच होऊ शकते आणि आपल्याला तयार राहावे लागेल असं द्विवेदी यांनी म्हटलं होतं. तसेच ऑपरेशन सिंदूर दरम्यान, सशस्त्र दलांना पूर्णपणे स्वातंत्र्य देण्यात आले होते, त्यामुळे ऑपरेशन यशस्वी झाले

# अपघातातील जखमी जनावरांचे प्राण डॉ. तेजस दुनघव यांनी वाचविले!

## सर्व स्तरातून डॉ दुनघव यांचे होत आहे कौतुक

बीड दि.११(प्रतिनिधी)- शहरातील बसस्थानका समोर शनिवार रोजी रात्री 12:15 वाजण्याच्या सुमारास जालना रोडवर एका अज्ञात वाहनाने मोकाट जनावरांसह दोन म्हशींच्या पिल्लांना धडक दिली. यात मोकाट जानावरांसह म्हशींची दोन्ही पिल्ले गंभीर जखमी झाल्याची माहिती डॉ. तेजस दुनघव यांना मिळताच दुनघव यांनी तत्काळ जखमी जनावरांवर उपचार केल्यामुळे जीवदान मिळाले. डॉ दुनघव यांनी कामामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की बीड शहरातील बस स्थानकासमोर नेहमीच मोकाट जनावरांचा वावर असतो. काही प्रसंगी हे जनावरे रस्त्यावर ठाण मांडून बसलेले असतात. त्यांच्यामुळे अनेक वेळा अपघात झालेले आहेत. शनिवार रोजी रात्री 12:15 वाजण्याच्या सुमारास जालना रोडवर एका चारचाकी वाहन मोकाट जनावरांसह दोन म्हशींच्या पिल्लांना जोरात धडक देऊन ही चारचाकी दुभाजकावर गेली.



या अपघातात दोन म्हशीचे पिल्ले गंभीर जखमी अवस्थे मध्ये पडले होते. या घटनेची माहिती मिळताच जनावराचे डॉक्टर तेजस दुनघव यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी झालेल्या जनावरांवर उपचार करायला सुरुवात केली. अगदी वेळेत उपचार सुरू झाल्यामुळे गंभीर जखमी जनावरांना वाचवण्यात डॉक्टर दुनघव यांना यश आले. मोकाट गंभीर जखमी झालेल्या या जनावरांवर उपचार करून त्यांना जीवदान देणाऱ्या डॉ. दुनघव यांनी केलेल्या या कामामुळे जनावराचे प्राण वाचले आहेत. त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# हर घर तिरंगा अभियानात नागरिकांनी सहभाग घ्यावा : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे हर घर तिरंगा हे अभियान जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या अभियानाचा शेवटचा टप्पा १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत आयोजित केला आहे. या कालावधीत जिल्ह्यात प्रत्येक घरावर, सर्व शासकीय कार्यालये, खासगी आस्थापनांवर तिरंगा ध्वज फडकविण्याचे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. या कालावधीत प्रत्येक घरावर, कार्यालयावर राष्ट्रध्वज फडकविणे अभिप्रेत आहे. त्या दृष्टिकोनातून संबंधित विभाग, कार्यालयांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आज घेण्यात आली. या बैठकीस विविध विभागाचे तालुका व जिल्हास्तरावरील अधिकारी उपस्थित होते.

# उज्वल व्यसनमुक्ती उपचार व पुनर्वसन केंद्र येथे रक्षाबंधन कार्यक्रम

शिलवंत बहुउद्देशिय विकास संस्था जाख द्वारा संचालित उज्वल व्यसनमुक्ती उपचार व पुनर्वसन केंद्र साकोली येथे दि. 10/08/2025 रोजी, रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी संचालिका उषा घोडेस्वार यांनी उपचार घेणाऱ्या केंद्रातील सर्व लाभार्थ्यांना रक्षाबंधनाच्या पावन सणांनिमित्त राखी बांधून नारळी पौर्णिमा व बहीण भावाच्या नात्यातील महत्व समजावून सांगितले. व्यसनामध्ये वाहत चाललेली तरुणाई, कुटुंबाला कशी विसरत चालली आहे, याबद्दल मार्गदशन करून, सर्व लाभार्थ्यांना एकजूट होण्याची संधी या रक्षाबंधनातून मिळाली, बदलाची सुरुवात स्वतःपासूनच करा असे आव्हाहन देण्यात आले, कार्यक्रमाचे प्रस्थाविक मा. शिलवंत घोडेस्वार यांनी केले, या निम्मित मा. गंगाधर धुवाधपारे सर उज्वल व्यसनमुक्ती केंद्र साकोली संचालिका मा. उषा घोडेस्वार, केंद्राचे व्यवस्थापक मा. शिलवंत घोडेस्वार व केंद्र प्रमुख मा. गंगाधर धुवाधपारे, संस्थेचे कोषाध्यक्ष मा. विवेक खोब्रागडे, नर्स जयश्री चिमनकर, रोहिणी गजभिये, अमित बर्वे, विशाल मेश्राम हे उपस्थित होते. सर्व मान्यवर व कर्मचारी वर्ग यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम अत्यंत व्यवस्थितरित्या पार पडला.

# माद‌ळमोहीत ग्रॅनाईट, फरशी, प्लंबिंग, सिमेंट आणि लोखंड विक्री धडाक्यात जीएसटी बायपासचा खेळ उघडपणे!

मादळमोही (प्रतिनिधी) – गावात बांधकाम साहित्याचा मोठा बाजार रंगला आहे. ग्रॅनाईट, फरशी, प्लंबिंग साहित्य, सिमेंट आणि लोखंड विक्री करणारी काही मोठी दुकाने रोज लाखोंची उलाढाल करत आहेत. मात्र, या व्यवहारात जीएसटी कायद्याला चुकवून रोखात विक्री केल्याचे गंभीर आरोप समोर येत आहेत. ग्राहक व बांधकाम व्यावसायिक सांगतात की, अनेक दुकानदार बिलाशिवाय कमी दरात माल देतात. "बिल नको, तर सवलत"



हा फॉर्म्युला खुल्लमखुल्ला वापरला जात आहे. लोखंडी सळया, रॉड, टाइल्स, ग्रॅनाईट, पाईप्स, टॅप्स, सिमेंट – काहीही घ्या, बिल मागितलं तर किंमत जास्त; बिल नको म्हटलं तर थेट स्वस्त! या पद्धतीमुळे शासनाच्या महसुलात मोठी गळती होत आहे. प्रामाणिकपणे जीएसटी भरून व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांना अन्यायकारक स्पर्धेला सामोरं जावं लागत आहे. – "जीएसटी विभाग झोपेतून कधी उठणार? छापे टाकून नोंदी तपासल्या तर लाखोंचा महसूल अपहार समोर येईल."

# वडवणी येथील गोपाळ नगरचा राजा गणेश मंडळाची कार्यकारणी जाहीर ,

## अध्यक्षपदी बळीराम नागरगोजे उपाध्यक्षपदी रवी जाधव

वडवणी बीड प्रतिनिधी, अंकुश गवळी वडवणी शहरातील गोपाळ नगर चा राजा गणेश मंडळाची कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे आता येणाऱ्या काही दिवसातच गणेशोत्सव हा येत आहे या पार्श्वभूमीवर वडवणी शहरातील गोपाळ नगर चा राजा गणेश मंडळाची कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे यावेळी अध्यक्षपदी बळीराम नागरगोजे, उपाध्यक्षपदी रवी जाधव ,गणेश पाबळे खजिनदार म्हणून अजय खांडवे, सचिव निखिल माळी, सहसचिव बाळासाहेब पेशवे ,कार्याध्यक्ष सय्यददलाल सय्यद ,अनिकेत करपे महिला कार्याध्यक्ष प्रमिलाताई माळी, कवचट ताई आदींच्या गणेश मंडळाच्या कार्यकारणी पदी निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत,

# दिल्लीतील निवडणूक आयोगाविरोधातील मोर्चात बीडचे खा.सोनवणे आघाडीवर

## महाराष्ट्रात मतदानाच्या आदल्यादिवशी मतदार यादीत नावे सामाविष्ठ केली: खा.सोनवणे

बीड: मतचोरी प्रकरणी दि.११ ऑगस्ट रोजी इंडिया आघाडीच्या ३०० खासदारांनी संसदेचे मकरद्वार ते निवडणूक आयोग कार्यालयापर्यंत काढलेला मोर्चा दिल्ली पोलीसांनी आडविला. दरम्यान, या खासदारांमध्ये देशाचे नेते शरद पवार, राहूल गांधी, खा.सुप्रिया सुळे यांच्या खांद्याला खांदा लावून बीडचे खा.बजरंग सोनवणे आघाडीवर होते. यावेळी त्यांनी महाराष्ट्रात देखील मतदानाच्या आदल्या दिवशी मतदार यादीत नावे, समाविष्ठ केली जात होती, असा खळबळजनक आरोप केला. इंडिया आघाडीच्या ३०० खासदारांनी संसदेचे मकरद्वार ते निवडणूक आयोग कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यास सुरुवात केल्यानंतर दिल्ली पोलिसांनी अडवला. खासदारांनी हातामध्ये 'सेव्ह व्होट'चे बॅनर घेतले होते. तथापि,




दिल्ली पोलिसांनी सांगितले होते की इंडिया आघाडीने या मोर्चासाठी कोणतीही परवानगी घेतली नाही. बिहारमधील मतदार यादीतील अनियमिततेच्या आरोपावरून कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली ३०० विरोधी खासदारांनी दिल्लीत पायी मोर्चा काढला आहे. या मोर्चात बीडचे खासदार बजरंग

> लोकशाही टिकवण्यासाठी निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी इंडिया आघाडी एकत्र उभी आहे. ही लढाई लोकशाही वाचविण्यासाठी असून आम्ही ती शेवटपर्यंत लढणार आहोत.
> **-खा.बजरंग सोनवणे, बीड.**

सोनवणे आघाडीवर होते. तर संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा १६ वा दिवस असून लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास सुरू होताच विरोधी खासदारांनी गोंधळ सुरू केला. खासदारांनी 'वुई वॉन्ट जस्टिस'च्या घोषणा देत सभागृहाच्या वेलमध्ये पोहोचले. यानंतर सभापती ओम बिर्ला यांनी लोकसभा दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब केली. लोकसभा आणि राज्यसभेचे कामकाज सकाळी ११ वाजता सुरू झाले. लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास सुरू असताना विरोधकांनी 'आम्हाला न्याय हवा आहे' अशा घोषणा दिल्या. यावेळी माध्यमांशी बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, इंडिया आघाडीचा मोर्चा निवडणूक आयोगावर आहे. मात्र, याआधी पोलीस बळाचा वापर करण्यात येत आहे. निवडणूक आयोगाला राहूल गांधींवर बोलण्याचा आधिकारी नसून कायदा हा निवडणूक आयोगाच्या घरचा नाही. त्यांनी भाजपसाठी काम करणे सोडावे. निवडणूक आयोग भाजपची बी टिम असल्याचा उल्लेखही खा.सोनवणे यांनी केला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

मंगळवार १२ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

# वनतारा की जनतारा?

कोल्हापूरमधील नांदणीच्या प्रसिद्ध करवीर मठातील महादेवी उर्फ माधुरी हत्तीण गुजरातच्या वनतारा प्रकल्पामध्ये पाठवण्यात आली आहे. याला निमित्त ठरली आहे ती उच्चाधिकार समिती आणि पेटा संस्था! या जनमताची धग महाराष्ट्रभरात पसरली आहे.गेले काही दिवस कोल्हापूरमधील भावनात्मक वातावरण पेटले आहे. त्याला कारणही तसेच आहे. कोल्हापूरमधील नांदणीच्या प्रसिद्ध करवीर मठातील महादेवी उर्फ माधुरी हत्तीण गुजरातच्या वनतारा प्रकल्पामध्ये पाठवण्यात आली आहे. या जनमताची धग महाराष्ट्रभरात पसरली आहे. कोल्हापूरकरांनी आपली लाडकी माधुरी परत आणण्याचा जणू चंगच बांधला आहे. जगात भारी आमची कोल्हापुरी ही कोल्हापूरकरांची खरी ओळख. कोल्हापूरकरांनी एकदा ठरवले की, ते खटका पडल्याशिवाय राहत नाहीत. ङ्गप्राडाफ या जगप्रसिद्ध कंपनीने नुकताच कोल्हापुरी चपलेचा दणका अनुभवला आहे. आताही कोल्हापूरसह महाराष्ट्राचे वातावरण ढवळून निघाल्याने ही महादेवी ङ्गजनताराफ बनली आहे. यानिमित्त पुन्हा चर्चेत आला आहे तो गुजरातच्या भावनगरमधील प्रसिद्ध ङ्गवनताराफ प्रकल्प! ङ्गकायफ आहे हे महादेवी हत्तीण प्रकरण? कोल्हापूरमध्ये सन १९५० साली स्थापन झालेला प्रसिद्ध स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी संस्थान मठ आहे. करवीर मठ या नावानेही हा मठ प्रसिद्ध आहे. १९९२ पासून महादेवी नावाची हत्तीण ट्रस्टकडे आहे आणि धार्मिक कार्यक्रमांसाठी मठात हत्ती ठेवण्याची धार्मिक परंपरा असल्याचे म्हटले जाते. हत्तीची देखभाल करणे ही ट्रस्टच्या उपक्रमांचा अविभाज्य भाग आहे. या पेटा संस्थेने संस्थानात असणाऱ्या महादेवी उर्फ माधुरीवर अत्याचार होत असल्याची तक्रार उच्चाधिकार समितीकडे केली. या तक्रारीची दखल घेत समितीने २८ डिसेंबर २०२३ रोजी महादेवीला राधे कृष्ण मंदिर हत्ती कल्याण ट्रस्ट (वनतारा)ला सोपवण्याचे आदेश दिले. करवीर संस्थान उच्च न्यायालयात महादेवी हत्तीण वनताराला सोपवण्याच्या निर्णयाविरोधात करवीर संस्थानने उच्च न्यायालयात दाद मागितली. यात आपल्याकडे या हत्तीणीची मालकी असून, तिची नोंदणीही आहे. तसेच उच्चाधिकार व वनविभागाचे अधिकारी नियमितपणे मठाला भेट देऊन हत्तीणीची तपासणीही करतात. समितीचा निर्णय एकतर्फी असून, आपण दिलेल्या निवेदनाचा विचार करण्यात आला नाही. यावर न्यायालयाने समितीला पुन्हा चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.

# बालपणीच्या आठवणींतील नागपंचमी



"गेले ते दिवस आणि राहिल्या त्या फक्त आणि फक्त आठवणी!" आपल्या भारतीय संस्कृतीत सण-उत्सवांना खूप मोठं महत्त्व आहे. देशाच्या विविध भागांमध्ये अनेक सण पारंपरिक पद्धतीने साजरे केले जातात. भारतीय समाज हा खरंच "उत्सवप्रिय" म्हणावा लागेल. आपले अनेक सण, उत्सव, प्रथा आणि परंपरा या निसर्गचक्राशी जोडलेल्या आढळतात. असाच एक पवित्र आणि आनंददायी सण म्हणजे नागपंचमी. श्रावण महिन्यातील पहिला सण म्हणजे नागपंचमी. या सणाच्या नावावरूनच याचा संबंध सापाशी आहे, हे लक्षात येते. साप हा "शेतकऱ्यांचा मित्र" मानला जातो. त्याची पूजा वर्षातून एकदा नागपंचमीच्या दिवशी केली जाते, ही कृतज्ञतेची भावना दर्शवणारी परंपरा आहे. आज नागपंचमीच्या दिवशी बालपणीचा तो गावरान, निरागस काळ आठवतो... लहानपणी, म्हणजे शाळेत असताना, नागपंचमी जवळ आली की सगळ्यांची लगबग सुरू व्हायची ती झोक्यासाठी जागा धरण्याची! कोणी झाडाच्या फांदीला फाटके पोते बांधून झोका लावायचं ठिकाण आधीच पकडून ठेवायचं. त्या झोक्यासाठी फाटकीच पोती असायची, पण त्यामागे लपलेला प्रामाणिकपणा आणि मैत्री ही खरी मोठी गोष्ट होती. कोणी दुसऱ्याच्या जागेवर झोका बांधत नसे – एवढा प्रामाणिकपणा त्या बालमित्रांमध्ये होता. आमच्या धनगर गल्लीत झाडांची संख्या जास्त असल्यामुळे सर्व गावातील मुले येथे झोके खेळायला यायची. आम्ही सगळ्यांना सामावून घ्यायचो. त्या दिवसांत गल्लीतले खेळ, गोंधळ, आणि झोक्यांची मजा काही औरच असायची! हंडाळबाईची प्रीती, कदम गुरुजींची सुरेखा, वच्छला आक्काची सविता, नजनची अलका – यांची गट्टी भारी होती. त्यांचं हसणं, खेळणं, एकत्र गप्पा मारणं, या आठवणी आजही ताज्या वाटतात. तर,नगरेचा भावड्या, शिंदेबाईचा भावड्या, सकूबाईचा भावड्या, तुकाराम अण्णांचा भावड्या,विष्णू मामाचा पिंट्या, कदमाचा पिंट्या, नजन डॉक्टरचा दीपक, हंडाळ डॉक्टरचा प्रसाद, कदम गुरुजींचा सुनील – हे सारे मित्र मिळून गावात झोके खेळायचे आणि सणाचा आनंद साजरा करायचे. मोठे भाऊ झोके बांधून द्यायचे. पंचमी म्हणजे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी आनंदाची पर्वणीच असायची. या सणाचं एक खास वैशिष्ट्य म्हणजे – नवविवाहित मुलींना सासरहून माहेरी यायची संधी मिळायची. आई-वडील आनंदात असायचे. मुलगी माहेरी आली की तिच्या सासरच्या "गुजगोष्टी" ऐकण्यासाठी सगळ्यांची उत्सुकता शिगेला पोहोचलेली असायची. पंचमीच्या चार-पाच दिवस आधीपासूनच झोके बांधले जायचे. सणाच्या आदल्या दिवशी हातावर मेहंदी, दारात रांगोळ्या – घरात उत्सवाचं वातावरण तयार व्हायचं. सकाळी भिंती पोचारून त्यावर सापाचं चित्र काढायचं, नागदेवतेची पूजा करायची, आणि मग आमची टोळी वारूळ शोधायला बाहेर पडायची. तोपर्यंत आई पुरणपोळीच्या तयारीत गुंग असायची. पूजा झाल्यावर नवे कपडे घालून उंच झोक्यांवर चढण्याची मजा सुरू व्हायची. "पंचमीचा झोका... ला धरून ठोका!" असं गाणं म्हणत उंच उंच झोके खेळले जायचे. लिंबाचा पाला तोंडात आणण्याची चढाओढ रंगायची. भजे, कुरडई, पापड खाताना मस्त मजा यायची. मध्येच आई म्हणायची, "फुटाणे-लाह्या घेऊन ये रे!" ते तयार करण्यासाठी आदल्या दिवशीच हरभरे आणि ज्वारी गरम करून, पोत्यात गुंडाळून ठेवले जायचे. फुटाणे आणि लाह्या करण्यासाठी दिवाकर गुरुजींच्या वाड्यापुढे भट्टी पेटायची. तिथे नंबर लावून आपल्या लाह्या-फुटाणे भाजून घ्यायच्या. लाह्या फुटताना पाहणं – त्यातच एक वेगळी गंमत असायची. दुपारनंतर गावातील स्त्रिया, नवविवाहित मुली, तरुणी – सर्व गावभर झोके खेळायला निघायच्या. प्रत्येक गल्लीत, प्रत्येक झोक्यावर एकदा तरी झोका खेळणे हे ठरलेले! सायंकाळी घराघरांमध्ये झोक्यांची सैर सुरू व्हायची. हातावरची मेहंदी आणि झोका खेळून आलेले फोड – हे आनंदाचे सुंदर आठवणीतले पुरावे असायचे. झोक्याचे चढ-उतार हेच आयुष्यातील सुखदुःखाचे प्रतीक आहेत, याची नकळत शिकवण या सणातून मिळायची. आजच्या मोबाईल युगात ही परंपरा हळूहळू विस्मरणात चालली आहे. ज्या झाडांवर झोके बांधले जायचे, ती अनेक झाडं आता नाहीत – अंधश्रद्धा, जागेअभावी किंवा अज्ञानामुळे ती तोडली गेली. मुलांच्या मनातून सणाचं महत्त्व कमी होत चाललं आहे. नवविवाहित सूनबाईंच्या, लेकीच्या "गुजगोष्टी" मोबाईलने ऐकण्याची गरजच उरलेली नाही. पूर्वीची नागपंचमी आता फक्त आठवणीत राहिली आहे. > "आता ना राहिली झाडं, ना राहिले झोके, ना राहिलं ते बालपण... म्हणूनच म्हणावं लागतं – 'गेले ते दिवस आणि उरल्या त्या फक्त आणि फक्त आठवणी!' ---

**शब्दगुंफन??**
**संदीप तुकाराम काळे सर**
**प्राथमिक शिक्षक, गंगापूर ?**
**९४२३७०४९७४**

# समृद्धीचे नामकरण भन्ते धम्मप्रिय यांच्या हस्ते धम्म संस्कारविधीने संपन्न समाजाने बुद्धांचे विचार आत्मसात करावे – दत्ता कांबळे

माजलगाव :( प्रतिनिधी ) : शहरालगत असणारे पुनर्वसित ब्रम्हगाव येथील आंबेडकरी चळवळीचे सामाजिक कार्यकर्ते तथा भारतीय काँग्रेस पक्षाचे अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या कन्येचा दैदीप्यमान असा प्रथम वाढदिवस व नामकरण सोहळ्याचा कार्यक्रम संपन्न झाला. सदरील नामकरण हे दादर मुंबई येथील चैत्यभूमीचे कोषाध्यक्ष भन्ते धम्मप्रिय यांच्या हस्ते बौद्ध धम्म पद्धतीने संस्कारविधी करून समृद्धी दत्ता कांबळे असे नामकरण कार्यक्रम हजारोच्या गर्दीत संपन्न झाला. सदरील नामकरण हे आंबेडकरी चळवळीचे प्रणेते कालवश कर्मवीर ॲड.एकनाथ आवाड यांच्या धम्म चळवळीतील प्रेरणाने प्रेरित होऊन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर



यांच्या धम्म चळवळीचा विचारांचा प्रचार व प्रसार करण्या बरोबरच समाजामध्ये परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने टाकलेले एक क्रांतिकारी पाऊल असून, समाजाने बुद्धांचे विचार आत्मसात करावे असा संदेश सदरील नामकरणाच्या माध्यमातून समाजामध्ये पोहचला. यावेळी समृद्धी बाळाचे आजोबा लक्ष्मण



कांबळे, काका अशोक कांबळे, सुनील कांबळे, मामा रुद्रा कासार, संगेसोयरे नातेवाईक तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते मोहन जगताप,भारतीय काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, कम्युनिष्ठ पक्षाचे जेष्ठ नेते कॉ. मुसद्दीक बाबा,बौध्द महासभेचे संस्कार सचिव एस. एन. वाघमारे,पर्यटन सचिव के. व्ही. साळवे, तालुकाध्यक्ष डॉ. भागवत साळवे, मंदाताई साळवे, रेखाताई भारस्कर, संभाजी नगर विभागाचे विक्रीकर उपाधीक्षक भीमराव नाडे,भाजपाचे दत्ता महाजन, नगरसेवक विनायक रत्नपारखी,पवन मोगरेकर, आनंद कुलकर्णी, वंचितचे धम्मानणंद साळवे, अंकुश जाधव, गिफ्टहबचे संचालक रामानंद लड्डा, ॲड. याकूब मेमन, नगरसेवक इमरान शेख,एकनाथ मस्के, काँग्रेसचे सुधाकर कांबळे,नारायण होके, अफरोज तांबोळी पत्रकार संघांचे अनंत घडसिंगे,दिनकर शिंदे, बालासाहेब उपाडे सह विविध सामाजिक, राजकीय व प्रशासकीय, औद्योगिक क्षेत्रातील नामांकित व्यक्तिमत्व उपस्थित होते.

# अँड राज पाटील यांना वीर शिवछत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार प्रदान सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव

वडवणी बीड प्रतिनिधी अंकुश गवळी लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष ऍड राज पाटील यांना सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल वीर छत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार व अजिंक्यतारा २०२५ चा पुरस्कार अहिल्यानगर येथे रविवार दि १० ऑगस्ट रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आल्याने त्यांच्यावर सर्वत्र अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

वडवणी तालुक्यातील तिगावचे विद्यमान सरपंच तथा सरपंच परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष अँड राज पाटील यांनी लढा दुष्काळाशी फाउंडेशनच्या माध्यमातून निसर्गसंवर्धन, जलसंधारण, शेती रस्ते, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, तसेच कोरोना काळात गरजूंना अन्नधान्य व आरोग्यविषयक साहित्य पुरविण्याचे कार्य सातत्याने केले आहे. त्यांनी आजपर्यंत हजारो वृक्षांचे वाटप केले असून, समाजात रक्तदानासह अवयव दान व मरणोत्तर देहदान जनजागृती सोबत, स्वतः ५० वेळा रक्तदान केले आहे, २७ वेळा रक्तदान शिबिर आयोजन व अवयव दान, मरणोत्तर देहदान फॉर्म भरला आहे. गावचे सरपंच म्हणून कार्य करताना त्यांनी सरपंच परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून शेकडो सरपंचांच्या समस्या मांडून त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्यांसाठी, शेती रस्ते व जलसंधारणाच्या माध्यमातून मोठे काम उभे केले आहे. तसेच मराठा आरक्षणाच्या लढ्यातही गेल्या पाच वर्षांपासून त्यांचा सक्रीय सहभाग राहिला आहे. त्यांच्या या कार्याची दखल अहिल्यानगर येथील अनाथ सेवक सामाजिक कल्याण संस्था महाराष्ट्र या संस्थेने घेतली. वीर शिव छत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार व अजिंक्यतारा २०२५ चा पुरस्कार नगर सेवक डॉ. सागर बोरुडे,रिल स्टार शिवानी बनकर ॲक्टर सचिन चव्हाण, ॲक्टर अर्जुन अंबेकर, सस्थेचे अध्यक्ष तुषार बोरुडे, अँकर सिमा डुकरे यांच्या हस्ते देण्यात आला. त्यांच्यावर सर्व स्तरांमधून अभिनंदनचा वर्ष होत आहे.

## मित्रपरिवार आणि पत्रकार मंडळींचे सहकार्य

कोणतेही समाजकार्य तन मन धनाने केले तर मानसिक समाधान मिळते. गोर गरीबांना मदत करणे, झाडे लावणे, गोरी गरीब शेतकऱ्यांच्या मुला मुलींना शालेय साहित्य देणे, जो गरजु माझ्याकडे मदत मागायला आला तो कधीच खाली हाताने जाऊ देत नाही. त्याच्यात मला अनंद मिळतो. त्यांच्या आशिर्वादाने गावकऱ्यांच्या, मित्र परीवाराच्या आणि वडवणी तालुक्यातील तसेच बीड येथील सर्व पत्रकारांचे मार्गदर्शन आणि सहकार्य मिळाले असल्याने माझ्या कामाची दखल घेत सन्मानाचे पुरस्कार मिळत आहेत.

**अँड राज पाटील**
**(अध्यक्ष लढा दुष्काळाशी फाउंडेशन )**



दैनिक लोकआरंभ लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १२ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



## कै.दादा कोंडके..

कृष्णा कोंडकेचे दादा कोंडके झाले,
विनोदाचे बादशहा म्हणून प्रसिद्ध झाले.
मराठी भाषेवर प्रभुत्व गाजविले,
सिने जगात नाव अमर केले./१/

मनोरंजनातून प्रबोधन करीत असत.
व्दी अर्थी शब्दांचा खेळ मांडत असत,
सेन्सार बोर्डाला अर्थ समजून सांगत.
विनोदाने महाराष्ट्राला हसवत असतं/२/
विच्छा माझी पुरी करा गाजले,
सिनेमाच्या पडद्यावर सर्वांना हसविले,
दादा सारखे दुसरे नाही कुणी झाले,
दादा अचानक कायमचे सोडून गेले,/३/
कुशाग्र विनोदी शैली दादा तुमची,
दोन अर्थाची गाणी आणि तुमची,
राजकीय पटलावर चाणाक्ष नजर तुमची,
यावे पुन्हा जन्माला इच्छा असे आमची,/४/
महाराष्ट्र सारा खळखळून हसविला,
तुमच्या जाण्याने महाराष्ट्र सारा हळहळला,
बाळासाहेबांनी दादाला शब्द दिला,
सोंगाड्या चित्रपटगृहात दाखल झाला,/५/
शिवसैनिक कट्टर दादा कोंडके होते,
बाळासाहेब ठाकरेशी मैत्रीचे नाते होते.
मराठी माणसाचे दादा आवडते होते,
सरळ स्वभावाचे सरळ मनाचे होते,/५/
नवू सिनेमा सुपरहिट झाले,
अभिनया सोबत दिग्दर्शन केले,
तांबडी माती व्दारा पदार्पण केले,
दादा कोंडके महाराष्ट्र भर अमर झाले./६/

**भारत कवितके**
**मुंबई कांदिवली पश्चिम**
**8652305700**

## हर घर तिरंगा मोहिमेत मॅरेथॉन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

परभणी ।प्रतिनिधी हर घर तिरं-गा मोहिमेअंतर्गत विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या मोहिमेतील पहिला उपक्रम म्हणून आज (१० ऑगस्ट) सकाळी खुल्या मॅरेथॉन दौड स्पर्धा उत्स-ाहात पार पडली.ही ६ कि.मी. मॅरेथॉन छत्रपती शिवाजी महार-ाज पुतळा - कै. वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ कमान - वळसा - पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज पुतळा - प्रभाग समिती ङ्बफ या मार्गावर आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत शाळा-महाविद्या-लयीन विद्यार्थी, युवक-युवती, नागरिक तसेच महानगरपालिका अधिकारी-कर्मचारी अशा एकूण १२५ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. सकाळी ७.३० वाजता महान-गरपालिकेचे मुख्य लेखा अधि-कारी डॉ. प्रभाकर काळदाते यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेला सुरुवात झाली. यावेळी सहायक आयुक्त आवेज हाश्मी, आस्थापना विभाग प्रमुख शिवाजी सरनाईक, क्रीडा व सांस्कृतिक विभाग प्रमुख राजकुमार जाधव, प्रा. रणजीत काकडे, रामेश्वर कुलकर्णी, श्रीकांत कुरा आणि उमेश जाधव उपस्थित होते.स्पर्धेत आदिनाथ सोळुंके यांनी प्रथम क्रमांक मिळवत ३००० पारितोषिक प्राप्त केले. सोप-ान शरद पवार यांनी द्वितीय क्रमांक पटकावून १५०० मिळवले, तर तृतीय क्रमांकासाठी ऋषीकेश बालटकर यांना १००० देण्यात आले. उत्तेजनार्थ पारितोषिक ५०० अर्जुन भाळशंकर यांना मिळाले. विजेत्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. विजेत्यांचे अभिनंदन आयुक्त धैर्यशील जाधव, उपायुक्त बबन गं. तडवी आणि सहायक आयुक्त प्रज्ञावंत कांबळे यांनी केले. स्पर्धे चे पंच म्हणून प्रा. रणजीत काकडे, प्रा. खाजा अब्दुल खदीर, प्रा. डॉ. गुरूदास लोकरे, क्रीडा शिक्षक यमनाजी भाळशंकर, शिवाजी खुणे, अमोल नंद, तुकाराम कल्याणकर आणि सचिन पवार यांनी कार्यभार

# शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आमरण उपोषण सुरू; विविध संघटनांकडून जोरदार पाठिंबा



प्रतिनिधी विठ्ठल ममताबादे (उरण) उरण दि ११ उरणमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी आजपासून (११ ऑगस्ट) आमरण उपोषण सुरू केले आहे. हे उपोषण सकाळी ८:३० वाजल्यापासून आर.के.एफ. जे.एन.पी. विद्यालय, शेवा, उरण येथील गेटसमोर सुरू आहे. उपोषणाच्या पहिल्याच दिवशी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आणि स्थानिक नागरिकांनी पाठिंबा दर्शवत कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना पाठिंबा दिला. यावेळी राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपोषणाची सुरुवात करण्यात आली. तसेच, १९८४ च्या शेतकरी आंदोलनातील पंच हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करून, दिवंगत लोकनेते दि. बा. पाटील यांच्या पुष्पहार घालण्यात आला. माजी विश्वस्त भूषण पाटील यांच्या हस्ते उपोषणाचा शुभारंभ करण्यात आला.

### प्रमुख मागण्या:कर्मचाऱ्यांनी खालील प्रमुख मागण्या शासनासमोर मांडल्या आहेत:

*** जुलाई २०१७ पासूनची वार्षिक वेतनवाढ आणि महागाई भत्त्याची थकबाकी तात्काळ कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावी. * जुन्या भविष्य निर्वाह निधी योजनेचा लाभ पुन्हा सुरू करावा. * गेली १० ते १२ वर्षे तुटपुंज्या मानधनावर काम करणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी करून शासकीय नियमानुसार वेतन व नेमणूक पत्र द्यावे. * सन २००३-०४ पासून मराठी माध्यमातून अनुदान न घेता दहावीच्या वर्गांना शासनाकडून १००% अनुदान स्वीकारावे. * जेएनपीटी प्रशासनाकडून दिली जाणारी PAP फी सवलतीची ३ लाख रुपयांची मर्यादा ८ लाख रुपयांपर्यंत वाढवावी. * सर्व पात्र कर्मचाऱ्यांना १२ वर्षांची वरिष्ठ श्रेणी व २४ वर्षांची निवड श्रेणीचा लाभ तात्काळ मंजूर करावा. * सातव्या वेतन आयोगातून ३१ महिन्यांची थकबाकी आणि सहाव्या वेतन आयोगाची ५१ महिन्यांची थकबाकी तात्काळ जमा करावी. * पन्नास टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात समाविष्ट करून बावीस महिन्यांची थकबाकी तात्काळ जमा करावी. * पाचव्या वेतन आयोगातील ६३ महिन्यांची थकबाकी जमा करावी.**

### विविध मान्यवरांनी दिला जाहीर पाठिंबा:

उपोषणाच्या पहिल्याच दिवशी विविध संघटनांचे पदाधिकारी, कामगार नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतातून कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना जाहीर पाठिंबा दर्शवला. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत उपोषणाला पाठिंबा देण्याची ग्वाही सर्वांनी दिली. यावेळी माजी विश्वस्त भूषण पाटील, जे एन पी टी विश्वस्त रवी पाटील साहेब, कामगार नेते संतोष पवार, पालक संघर्ष समितीचे अध्यक्ष किरण घरत, उपाध्यक्ष योगेश तांडेल, सचिव अविनाश म्हात्रे, उपाध्यक्ष रमाकांत म्हात्रे, सहसचिव विश्वास पाटील, कामगार नेते रवींद्र घरत (जासई), पंचायत समितीचे किरण विठ्ठल घरत, टीडीएफचे कार्याध्यक्ष नरसू पाटील, पीटीए सदस्य विकास कडू, काँग्रेस महिला अध्यक्ष (उरण) रेखा घरत, प्राध्यापक एल. बी. पाटील, सरपंच अनिता अरविंद घरत (करळ सावरखार), उपसरपंच जितेंद्र घरत (करळ सावरखार), उपसरपंच हेमलता भालचंद्र ठाकूर (जसखार), माजी सरपंच नितीन पाटील (जसखार), पंचायत समिती सदस्य दीपक ठाकूर (उरण), माजी सरपंच निशांत विष्णू घरत (नवीन शेवा), योगेश भगत (भेंडखळ), प्राध्यापक राजेंद्र मढवी,श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे (उरण), कामगार नेते सुरेश पाटील, भाजप उरण चिटणीस बळीराम घरत (जासई), सामाजिक कार्यकर्ते शिरीष म्हात्रे (जासई), उपाध्यक्ष अमर म्हात्रे (पालक संघर्ष समिती) आणि सामाजिक कार्यकर्ते अजित कृष्णा म्हात्रे (बेलपाडा) सविता नितीन मढवी सरपंच (नवघर) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी शाळेचे सर्व पालक, पालक संघर्ष समिती, माजी विद्यार्थी संघटना यांच्या प्रतिनिधींनीही उपस्थिती दर्शवून या उपोषणाला शेवटपर्यंत पाठिंबा देणार असल्याची ग्वाही दिली.

# न्हावा शेवा बंदरात रो-रो सेवा सुरु करा

## खासदार श्रीरंग बारणे यांची बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्र्यांकडे मागणी

प्रतिनिधी विठ्ठल ममताबादे उरण दि ११ मावळ - पिंपरी, चिंचवड, तळेगाव आणि चाकण हा परिसर देशातील सर्वात मोठ्या ऑटोमोबाईल उत्पादन केंद्रांपैकी एक म्हणून ओळखला जातो. या उद्योजकांना उत्पादनाची निर्यात करताना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. वाहतूक कोंडीत वेळ जातो. त्यासाठी न्हावा शेवा बंदरात रोल-ऑन, रोल-ऑफ (रो-रो) सुविधा सुरु करण्याची मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. याबाबत केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांची खासदार बारणे यांनी दिल्लीत भेट घेतली. खासदार बारणे म्हणाले, पिंपरी, चिंचवड, तळेगाव आणि चाकण हा औद्योगिक पट्टा देशातील सर्वात मोठ्या



ऑटोमोबाईल उत्पादन केंद्रांपैकी एक म्हणून ओळखला जातो. या औद्योगिक पट्ट्यात ११ हून अधिक प्रमुख ऑटोमोबाईल उत्पादन कारखाने आणि ४,००० हून अधिक सहायक युनिट्स आहेत,. जे ऑटोमोबाईल निर्यातीसाठी महत्त्वाचे आहे. बजाज ऑटो, टाटा मोटर्स, महिंद्रा अँड महिंद्रा, फोक्सवॅगन, मर्सिडीज-बेंझ, ह्युंदाई, जनरल मोटर्स, फोर्स मोटर्स, पियाजिओ, हिरो मोटोकॉर्प ऑटोमोबाईल उत्पादक कंपन्या आहेत. सध्या, रो-रो सेवा केवळ मुंबई पोर्ट अथॉरिटी (माझगाव/ कुलाबा क्षेत्र, दक्षिण मुंबई) मध्ये उपलब्ध आहेत. जिथे दिवसा गंभीर वाहतूक कोंडी आणि नो-एंट्री झोनमुळे प्रवेश प्रतिबंधित आहे. यामुळे केवळ लॉजिस्टिक्स विलंब होत नाही तर निर्यातदारांसाठी वाहतूक खर्चातही मोठी वाढ होते.

### औद्योगिक दृष्टिकोनातून मुंबई पोर्ट अथॉरिटी (माझगाव):-

तळेगाव एमआयडीसीपासून १४० किमी, न्हावा शेवा बंदर (जेएनपीटी) तळेगाव एमआयडीसीपासून ११० किलो मीटर आहे. न्हावा शेवा बंदर औद्योगिक क्षेत्राच्या जवळ आहे. महामार्ग कनेक्टिव्हिटी चांगली आहे. त्यामुळे ऑटोमोबाईल वाहतुकीसाठी अधिक योग्य बनेल. न्हावा शेवा येथे पुरेशी जागा उपलब्ध आहे. ज्याचा वापर रो-रो सेवा सुरू करण्यासाठी केला जाऊ शकतो. ही सुविधा सुरू केल्याने केवळ ऑटोमोबाईल उत्पादकांच्या निर्यात लॉजिस्टिक्सलाच मदत होणार नाही. तर, नवीन रोजगाराच्या संधीही निर्माण होतील. जे सरकारच्या 'मेक इन इंडिया' आणि 'व्यवसाय सुलभता' या दृष्टिकोनाशी सुसंगत असल्याचे खासदार बारणे यांनी निवेदनात म्हटले आहे. या धोरणात्मक हालचालीमुळे ऑटोमोबाईल उद्योगाला फायदा होईल, प्रादेशिक विकासाला चालना मिळेल आणि जागतिक स्तरावर भारताची निर्यात स्पर्धात्मकता बळकट होईल, असेही ते म्हणाले.

# पीएम उषा योजनेअंतर्गत डॉ. अश्विन रांजणेकर यांचे मार्गदर्शन

प्रतिनिधी पाचोड पाचोड- शिवछत्रपती महाविद्यालय पाचोड येथे पीएम उषा योजनेअंतर्गत 'Office Management and Administration' "कार्यालयीन व्यवस्थापन व प्रशासन" या विषयावर एक दिवसीय प्राध्यापक विकास कार्यक्रम(FDP) आयोजित करण्यात आला या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. अश्विन रांजणीकर उपस्थित होते. प्रा. सातोनकर यांनी प्रास्ताविक आणि कार्यक्रमाची रूपरेषा सादर केली त्यानंतर प्रा. तुकाराम गावंडे यांनी डॉ. रांजणीकर यांचा परिचय करून दिला.आपल्या सखोल मार्गदर्शनपर भाषणात डॉ. रांजणीकर सरांनी प्रशासकीय कौशल्याचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले की, "महाविद्यालयाच्या सुलभ कामकाजासाठी प्रत्येक प्राध्यापकामध्ये प्रशासकीय कौशल्य असणे आवश्यक आहे." त्यांनी नवीन शैक्षणिक धोरण (NEP) 2020 ची प्रभावी अंमलबजावणी कशी करता येईल यावर मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील विविध समित्यांचे कार्य केवळऔपचारिकता न राहता, विद्यार्थी आणि संस्थेच्या विकासासाठी त्यांचा कसा उपयोग करून घेता येईल हे त्यांनी सांगितले. तसेच, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता विविध उपक्रम राबवण्याचे आवाहनही त्यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे प्राध्यापकांना प्रशासकीय कार्य अधिक कार्यक्षमतेने करण्यासाठी एक नवी दिशा मिळाली. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कोठावळे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी महाविद्यालयाच्या प्रशासकीय कामकाजात प्राध्यापकांची भूमिका किती महत्त्वाची आहे हे स्पष्ट केले. नवीन शैक्षणिक धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. प्रा. विनोद कांबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी उपप्राचार्य डॉ.शिवाजी यादव डॉ. सुरेश नलावडे डॉ. सुभाष पोटभरे डॉ. विलास महाजन डॉ.हेमंत कुमार जैन डॉ. गांधी बानायत डॉ. ह. सो. बिडवे डॉ. भगवान जायभाय प्रा. सचिन कदम प्रा.अरुणा दसपुते सतीश वाघ डॉ.विठ्ठल देखणे प्रतीक देशमुख वैभव राऊत उपस्थित होते.

# पालकमंत्री अजित दादांचे बीडवर लक्ष; विकासासाठी जादूची कांडी फिरणार ?

**ध्वजारोहण कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित दादा पवार बीडमध्ये; प्रलंबित विकासकामांना गती मिळण्याची शक्यता.**

बीड - बीड जिल्ह्याच्या विकासकामांवर आता पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे लक्ष वेधले गेले आहे. येत्या ध्वजारोहण कार्यक्रम ाच्या पार्श्वभूमीवर जिल्हावासीयांमध्ये अपेक्षांचे वातावरण निर्माण झाले आहे.मंत्री यादीत बीड येथे ध्वजारोहणासाठी अजित दादा पवार उपस्थित राहणार असून, जिल्ह्यातील अनेक प्रलंबित प्रकल्पांना गती मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.जिल्ह्यातील विकासाला नवे बळ बीड शहर आणि ग्रामीण भागात पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, शेतीसाठी सिंचन यांसारख्या महत्त्वाच्या प्रश्नांवर उपाययोजना करण्यासाठी अजित दादा पवार प्रत्यक्ष बैठका घेणार असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांच्यासोबतच्या चर्चेत ते तातडीचे निर्णय घेऊ शकतात, असा अंदाज व्यक्त होत आहे. जादूची कांडी की प्रत्यक्ष काम?अजित दादांच्या दौऱ्यामुळे ङ्गजिल्ह्यातील विकासकामांसाठी निधी मंजुरी आणि अडथळे दूर करण्यासाठी जादूची कांडी फिरणार



का?असा प्रश्न नागरिकांमध्ये चर्चेत आहे. गेल्या काही महिन्यांपासून बीडमध्ये मोठ्या प्रमाणावर विकासकामे रखडलेली असल्याने या भेटीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.ध्वजारोहण कार्यक्रमाचे औचित्य स्वातंत्र्य दिनी होणाऱ्या ध्वजारोहण कार्यक्रमासाठी अजित दादा पवार बीडमध्ये उपस्थित राहणार आहेत. यावेळी विविध शासकीय योजना, नवे प्रकल्प आणि मंजूर होणाऱ्या निधीबाबत महत्त्वाच्या घोषणा होण्याची शक्यता आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १२ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



# डोनाल्ड ट्रम्प यांचे टॅरिफ ठरणार फेल, भारत ५० देशांच्या मदतीने करणार अमेरिकेचा गेम

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला दणका देत 50 टक्के टॅरिफ लावण्याचा निर्णय घेतला आहे. भारतावर लावलेला हा 50 टक्के कर इतर कोणत्याही देशांवर लादलेल्या सर्वाधिक करांपैकी एक आहे. हा कर दोन टप्प्यात लादण्यात आला आहे. यातील 25 टक्के कर आधीच लागू करण्यात आला आहे, तर उर्वरित 25 टक्के कर 28 ऑगस्टपासून लागू होणार आहे. भारत 50 देशांच्या मदतीने अमेरिकेला दणका देणार अमेरिकेच्या या निर्णयावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कडक पावले उचलणार असल्याचे संकेत दिले आहेत. आम्ही देशाच्या हितासाठी योग्य निर्णय घेणार असल्याचे मोदींनी म्हटले आहे. भारताने ट्रम्पच्या निर्णयाला धक्का देण्यासाठी कर लादण्याचा निर्णय अयशस्वी करण्यासाठी भारताने नवीन नियोजन सुरू केले आहे. भारत आता 50 देशांच्या मदतीने अमेरिकेला दणका देणार असल्याचे समोर आले आहे. याबाबत माहिती जाणून घेऊयात. आफ्रिका आणि मध्य पूर्वेवर फोकस भारत आता अमेरिकेऐवजी इतर देशांमध्ये आपली निर्यात वाढवण्याच्या तयारीत आहे. यामध्ये पश्चिम आशिया, आखाती देश आणि आफ्रिकेतील 50 देशांवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. अमेरिकेने भारतीय वस्तूंवर कर लादल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. एका अधिकाऱ्याने सांगितले की, सरकार आता 50 देशांवर लक्ष केंद्रित करत आहे, या देशांमध्ये भारताच्या एकूण निर्यातीपैकी सुमारे 90 टक्के निर्यात केली जाते. आता ही निर्यात आणखी वाढवली जाणार आहे. वाणिज्य मंत्रालय यावर बारकाईने लक्ष ठेवून आहे. युरोपियन देश आणि ब्रिटनशी करार भारताने काही दिवसांपूर्वी




ब्रिटनसोबत मुक्त व्यापार करार केला आहे. ज्यामुळे भारताची निर्यात आणखी वाढणार आहे. यामुळे ब्रिटन आणि भारतामधील करारामुळे व्यापार 120 अब्ज डॉलर्सपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. तसेच भारताचा युरोपसोबतचा व्यापार करारही अंतिम टप्प्यात आहे. आइसलँड, लिकटेंस्टाईन, नॉर्वे आणि स्वित्झर्लंडसह इतरही देशांसोबत करार केला जाणार आहे. हा करार ऑक्टोबरपासून लागू होण्याची अपेक्षा आहे. यामुळे अमेरिकेकडून भारताला होणारे नुकसान या 50 देशांसोबतच्या व्यापारातून भरून काढले जाण्याची शक्यता आहे. यामुळे अमेरिकेचा भारतावर 50 टक्के कर लावण्याचा निर्णय फसण्याची शक्यता आहे.

# तलवारीच्या हल्ल्यात अनेकजण गंभीर जखमी

## वराह चोरीच्या वादातून रस्त्यावरच तुफान राडा; दगडफेक, तलवारीच्या हल्ल्यात अनेकजण गंभीर जखमी

अंबाजोगाई (प्रतिनिधी) मोरेवाडी शिवारात वराह चोरीच्या कुरापतीवरून सुरू झालेल्या वादातून झालेल्या तलवार आणि दगडफेकीत दोन्ही बाजूंनी गंभीर जखमी होण्याचा प्रकार घडला आहे. या घटनेत परस्परविरोधी तक्रारींवरून दोन्ही गटांतील एकूण आठ जणांवर अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात प्राणघातक हल्ला केल्याचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. घटनेविषयी मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी दिनेश लक्ष्मण जाधव (रा. सदर बाजार, अंबाजोगाई) यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, १० ऑगस्ट रोजी दुपारी अडीच वाजता ते व त्यांचे भाऊ भारत जाधव स्विफ्ट डिझायर गाडीतून भावाच्या जोगाईवाडी शिवारातील घरी जात होते. मोरेवाडीतील लाल सटवा मेंडके यांच्या घरासमोरून जात असताना गाडीच्या मागील काचेला जोरात आवाज आला. गाडी थांबविल्यावर लाला भागवत मेंडके, सुजीत उर्फ सुरज सटवा मेंडके, सटवा भागवत मेंडके आणि पवन मेंडके (सर्व रा. मोरेवाडी, अंबाजोगाई) यांनी घेराव घातला. भीतीपोटी तेथून निघून धउच् कॉलेजसमोर गाडी थांबवल्यानंतर आरोपी पुन्हा दोन दुचाक्यांवर आले. त्यांनी मजनावरे चोरतोस का?फ असा सवाल करत तलवारीने भारत जाधव यांच्या डोक्यात वार केला. बचाव करताना दिनेश जाधव यांच्या तळहातावर गंभीर जखम झाली. त्यानंतर दगडफेक करून भावंडांसह युवराज मेंडके, हेमंत जिरंगे यांनाही मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. सदर फिर्यादीवरून लाला मेंडके, सुजीत मेंडके, सटवा मेंडके आणि पवन मेंडके यांच्याविरुद्ध प्राणघातक हल्ल्याचा गुन्हा नोंदवण्यात आला. दरम्यान, लाला भागवत मेंडके (रा. मोरेवाडी) यांनी दरम्यान, लाला भागवत मेंडके (रा. मोरेवाडी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्याच दिवशी दुपारी अडीच वाजता भारत जाधव व त्यांचे सहकारी स्विफ्ट डिझायर गाडी थेट त्यांच्या घरासमोर आणून उभी केली. गाडी हटविण्याविषयी विचारणा केली असता मतुझे डुकरे आम्ही चोरून विकले, काही करु शकत नाहीसफ असे म्हणत शिवीगाळ केल्याचा दावा फिर्यादीने केला.

# पूर्णा पाटबंधारे खात्याद्वारे नदीकाठावरील ग्रामस्थांना सतर्कतेचा इशारा

: येलदरी जलाशयातील पाणीसाठ्यात ८९ टक्क्यांपर्यंत वाढ ; कोणत्याही क्षणी पूर्णा नदीपात्रात पाण्याचा विसर्ग परभणी (प्रतिनिधी) खडकपूर्णा प्रकल्पातून २ गेटद्वारे पूर्णा नदीच्या पात्रात पाण्याचा मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु करण्यात आला असून त्यामुळे येलदरी जलाशयाच्या पाणलोट क्षेत्रातून येलदरीत मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवक सुरु आहे. सोमवारी सकाळी या जलाशयात ८९.७४ टक्के पाणीसाठा उपलब्ध झाला. त्यामुळे नदीपात्रातील पाण्याची आवक ओळखून पाटबंधारे खात्याद्वारे येथून पुढे केंव्हाही येलदरी येथील जलविद्युत केंद्रातील टर्माइनला व नदीपात्रातसुध्दा पाण्याचा विसर्ग केला जाईल, असे जाहीर केले आहे. दरम्यान, नदीपात्रावरील शेतकर्यांनी आपआपले नदीपात्रातील साहित्य किंवा जनावरे हटवावीत, असे निर्देश दिले आहेत. दरम्यान, पूर्णा पाटबंधारे प्रकल्पाच्या येलदरी जलाशयात सोमवारी ११ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत ८९.७४ टक्के एवढा जिवंत पाणीसाठा उपलब्ध होता. या प्रकल्पाची एकूण साठवण क्षमता ९३४.४४० दलघमी असून यामध्ये १२४.६७० दलघमी हा मृत साठा आहे, तर ८०९.७७० दलघमी जिवंत साठा मानला जातो. सद्यस्थितीत धरणात ७२६.६७५ दलघमी जिवंत तर १२४.६७० मृत पाणीसाठा असून एकूण पाणीसाठा ८५१.३४५ दलघमी इतका झाला आहे. जलाशयातील पाणी पातळी ४६०.९५० मीटर झाली आहे. यामुळे येलदरी धरण सध्या ८९.७४ टक्के क्षमतेने भरलेले आहे. गेल्या २४ तासांमध्ये धरणात १३.२५७/३३५.६२० दलघमी पाण्याची आवक झाली

# वातावरणातील बदलामुळे मानवी आरोग्यावर वाढते दुष्परिणाम

अलीकडील हवामानातील अनियमितता कधी ऊन, कधी मुसळधार पाऊस, वाढती आद्रता आणि उकाडा - यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा समतोल बिघडत आहे. मंठा शहरासह ग्रामीण भागात सर्दी, खोकला, घसा बसणे, अंगदुखी यांसारखे आजार मोठ्या प्रमाणावर वाढले असून लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत अनेकजण आजारी पडले आहेत. परिणामी दवाखाने रुग्णांनी हाऊसफुल झाले आहेत. आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार डेंग्यू, मलेरिया यांसारख्या डासजन्य आजारांचे प्रमाणही झपाट्याने वाढले आहे. अनियमित पावसामुळे साचलेल्या पाण्यात व गवताच्या वाढलेल्या प्रमाणात मच्छरांचीअवाढ होत आहे. त्यातच ढगाळ वातावरण व उकाड्यामुळे व्हायरल फिव्हर, श्वसनसंसर्ग आणि टायफॉईडसारखे आजार बळावले आहेत. रुग्णांमध्ये ताप, अंगदुखी, पुरळ, अंग खाजवणे, डोकेदुखी, मळमळ अशी लक्षणे प्रकर्षाने दिसत आहेत. साथीचा फैलाव रोखण्यासाठी धूरफवारणी, स्वच्छता मोहिमा, रुग्ण सर्वेक्षण यांसारख्या उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे

# बरेच लोक झाडाबद्दल अंधश्रद्धा बाळगून असतात.अंगणात पेरू,पप ई झाडं लावत नाहीत.

काही उच्चपदाधिकारीसुद्धा झाडांच्या बाबतीत गैरसमज बाळगून आहेत. माझ्या परिचयाचे एक गृहस्थ कर्करोगाने मेले.ते विड्या ओढायचे ,दारू प्यायचे. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबाने, अंगणात असलेलं पेरूचं भलंमोठं झाडं तोडून टाकलं.का तर म्हणे, अंगणात पंप ई असली की ती घराची सफाई करते. आणि पेरूमुळे वाईट घटना घडतात. ते दोन्ही झाडं तोडल्यानंतर त्या कुटुंबाचं काही तरी भलं व्हायला पाहिजे होतं,पण तसं झालं नाही.त्यानंतर चार-पाच वर्षांनी अचानक त्यांनी ते घर विकलं आणि ते एका फ्लॅटमध्ये राहायला गेले.तिथे त्यांना कुंडी ठेवायला देखील जागा नाही. खरंच, झाडं माणसं मारतात?ज्यांना फक्त देणं माहिती असतं,जे प्राणवायू देतात, जे पैशाची आणि पोटाची भूक भागवतात,ते अपशकुनी असतील का? जर झाड अपशकुनी आहे, तर मग... पशुपक्षी माणसाबद्दल काय विचार करत असतील?ते माणसाला शुभ तोंडाचा की पांढऱ्या पायाचा म्हणत असतील? आज मानवी कृत्यामुळे कितीतरी पशुपक्ष्यांचे निवारे उद्धस्त झालेत! वृक्षतोडीमुळे त्यांना रानमेव्यांची चणचण भासत असेल,तर त्यांना माणसाचं तोंड पाहू वाटत असेल? माणसाचा हात लागल्यावर किती झाडं भुईसपाट होतात तरी ते हात शुभच...जर झाडांना उठून दुसरीकडे जाता आलं असतं तर... कल्पना करा! माणसं पाहिल्या पाहिल्या ते पळून गेले असते आणि ओल्या फांदीनं बदडबदड बदडलं असतं .माणसाला सावलीत देखील उभं केलं नसतं.झाड त्याला म्हणालं असतं,"लाज वाटते का तुला?तू माझ्या फांद्या तोडल्यास आणि आता खुशाल सावलीत येऊन बसलास.चल ,निघ इथून!बेशरम कुठला!" किती तरी प्राणी,पक्षी रोज शिव्याशाप देत असतील... सगळी पृथ्वी खात आणली माणसानं. तरीही तो... असं म्हणत असतील.

# आमदार डॉ.गुट्टे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित आरोग्य शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

गंगाखेड (प्रतिनिधी) शहरातील संत जनाबाई महाविद्यालयाच्या प्रशस्त प्रांगणात आयोजित भव्य दोन दिवसीय आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न झाले. ग्रामीण व शहरी भागातील गरजू रूग्णांना योग्य औषधोपचार आणि आवश्यक असलेल्या वैद्यकीय सुविधा मोफत उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्ट े यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मुख्यमंत्री सहाय्यता निधी, धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष आणि मातोश्री दगडूबाई गुट्टे प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने हे भव्यदिव्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ग्रामीण व शहरी भागातील शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. तसेच हृदयविकार, मधुमेह, नेत्रविकार, कान नाक-घसा, हाडांचे विकार, महिलांचे आरोग्य, बालरोग आणि त्वचारोग अशा विविध आजारांसाठी तज्ज्ञ डॉक्टरांकडून १८३५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. आरोग्य शिबिराचे आयोजन हे केवळ वैद्यकीय तपासण्या करण्यापुरते मर्यादित नव्हते. तर या शिबिरातून ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांच्या आरोग्याबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी मोलाची मदत झाली. या दोन दिवसीय शिबिरात जनरल मेडिसन, जनरल सर्जरी, अस्थि विकार, बालरोग, हृदयरोग, नेत्रविकार, त्वचाविकार, स्त्री रोग, दंत रोग, कान, नाक आणि घसा विकार अशा विविध आजारांवर योग्य ते उपचार करण्यात आले. तसेच शिबीरात तज्ज्ञ डॉक्टरांची उपस्थिती, मोफत वैद्यकीय तपासण्या, औषधे वाटप व आरोग्यविषयक मार्गदर्शन यामुळे लोकांना केवळ आरोग्यसेवेसह, त्यांच्यात आरोग्याविषयी जागरूकताही निर्माण होण्यास मदत झाली. शिवाय, शिवाय, तज्ज्ञ डॉक्टरांकडू न रोग निदान, शिबिरानंतर आवश्यक शस्त्रक्रिया, रक्त व लघवी तपासणी, ईजीसी तपासणी सारख्या आवश्यक सुविधा देण्यात आल्या. त्यामुळे हे शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेणारे सर्व डॉक्टर, कर्मचारी, स्वयंसेवक, शासकीय कर्मचारी, आरोग्य विभागाचे अधिकारी, आधिपरिचारीका, अंगणवाडी सेविका, आशासेविका आणि नागरिकांचे आभार मानतो. तसेच ग्रामीण भागातील लोकांना दर्जेदार वैद्यकीय सेवा पुरवणे हे आमचे कर्तव्य आहे आणि भविष्यातही असे उपक्रम सुरू राहतील, असे आश्वासन स्थानिक आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी दिले. शिबिरात रुग्णांची प्राथमिक व सखोल तपासणी करून योग्य उपचारपद्धती सुचवण्यात आली. तसेच गरजूंना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले. शिबिरात आलेल्या प्रत्येक नागरिकाला त्यांच्या आजारानुसार योग्य आरोग्य सल्ला देण्यात आला. या शिबिरातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीममध्ये छ.संभाजीनगर, नांदेड, लातूर, परभणी, पुणेसह विविध ठिकाणांहून आलेले अनुभवी वैद्यकीय अधिकारी सामील झाले होते. त्यामुळे त्यांच्या उपस्थितीमुळे ग्रामीण जनतेला मोठ्या प्रमाणात लाभ झाल्याचे पाहायला मिळाले. विशेष म्हणजे शिबिरात महिलांच्या आरोग्य तपासणीसाठी स्वतंत्र विभाग उभारण्यात आला होता. स्त्रीरोग तज्ज्ञांनी महिलांशी संवाद साधून त्यांना विविध आरोग्य समस्या, योग्य आहार, लसीकरण आणि तपासण्या याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. शिबिरातील सहभागी रुग्णांना वेळेत व सुलभ पद्धतीने सेवा मिळावी यासाठी चांगली व्यवस्था करण्यात आली होती. तसेच डोळ्यांच्या तपासणीसाठी आलेल्या रुग्णांची दृष्टी तपासणी, मोतीबिंदू निदान, तर हाडांच्या विकारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना हाड व सांधेदुखीविषयी योग्य उपचार पद्धती सांगण्यात आल्या. बालरोग तज्ज्ञांनी लहान मुलांच्या पोषणस्थिती, लसीकरण आणि सामान्य आजारांविषयी पालकांना जागरूक केले. तसेच मुलांसाठी स्वतंत्र सल्ला केंद्रही सुरू करण्यात आले होते.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com